2017

Government of India
Ministry of Human Resource Development

Educational Survey Division
राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING
Sri Aurobindo Marg, New Delhi 110 016
Visit us at : http://www.ncert.nic.in

सर्व शिक्षा अभियान
सब पढ़ें सब बढ़ें

Class **8**

# National Achievement Survey

## Achievement Test

Test Form No. **81**

Medium of Instruction **Marathi (Semi English)**

**<< TO BE FILLED IN BY TEACHER >>**

**UDISE School Code** ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

**Area Code**
1 Rural 2 *Urban* ☐

**Section** *(Eg. Section A = 01, and likewise...)* ☐☐

**School Management**
1 Govt. 2 *Govt.-aided* ☐

**Student Gender**
1 Boy 2 *Girl* ☐

**CWSN** *(Children With Special Need)*
1 Yes 2 *No* ☐

**Student Aadhaar Number** ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

**Student Roll No.** *(As per Class Register)* ☐☐☐

**Social Group**
1 SC 2 *ST* 3 *OBC* 4 *General* ☐

**Student Name** ____________________

**School Name** ____________________

**District Name** ____________________

**State Name** **Maharashtra**

# सर्वसाधारण सूचना

1) चाचणीला सुरुवात करण्यापूर्वी क्षेत्रीय अन्वेषकाने विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधावा.

2) ही चाचणी शिक्षक किंवा अध्यापनाच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करण्यासाठी नाही. चाचणीची रचना विद्यार्थ्यास कशाचे ज्ञान आहे, समज आहे आणि विविध संदर्भाने ते प्रयुक्त करण्यास समर्थ आहे का? याचे अध्ययन करण्यासाठी आहे.

3) यु-डायस शाळा संकेतांक, विद्यार्थी ओळख क्रमांक, विद्यार्थी आधार क्रमांक, विभाग संकेतांक **(ग्रामीण - 1, शहरी - 2)**, शाळा व्यवस्थापन **(शासकीय - 1, शासकीय अनुदानित - 2)**, विद्यार्थी लिंग **(मुलगा - 1, मुलगी - 2)**, संवर्ग **(अ. जा. -1, अ. ज. - 2, इ. मा. व. - 3, खुला सर्वसाधारण - 4)**, विशेष गरजा असलेली मुले : **(चलनवलन विषयक दिव्यांगत्व - 1, अंध/अधुदृष्टी - 2, कर्णबधिर - 3, मुकबधिर - 4, गतिमंदत्व - 5, इतर दिव्यांगत्व - 6)**, विद्यार्थ्याचे नांव, शाळेचे नांव, जिल्हा संकेतांक आणि राज्य संकेतांक लिहा.

4) या पुस्तिकेत **60** प्रश्न आहेत. **सर्व** प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करा.

5) या पुस्तिकेत भाषा, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र असे **4** विषय आहेत. प्रत्येक विषयाचे **15** प्रश्न आहेत. भाषा : **1–15**, गणित : **16–30**, विज्ञान : **31–45** आणि सामाजिक शास्त्र : **46–60.**

6) या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आपल्याकडे **120 मिनिटे** आहेत. **ओ.एम.आर. प्रपत्रावर आपली उत्तरे नोंदवा.**

7) आपले उत्तर नोंदविण्यासाठी, **ओ.एम.आर. प्रपत्रावर** प्रश्नाच्या उत्तरासाठी योग्य पर्याय क्रमांकाच्या वर्तुळाला गोल गडद करा.

8) **ओ.एम.आर. प्रपत्रावरील वर्तुळाला गडद करण्यासाठी फक्त निळा किंवा काळा बॉल पेन/एच बी पेन्सिलचा वापर करावा.**

9) प्रत्येक प्रश्नाला **'1', '2', '3'** आणि **'4'** असे चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी केवळ एकच उत्तर बरोबर आहे.

10) खाली स्पष्ट केल्याप्रमाणे **ओ.एम.आर. प्रपत्रावर** काळजीपूर्वक उत्तर नोंदवावे.

उदाहरण :

**प्र. खाली दिलेल्या संख्यांपैकी सर्वात मोठी संख्या कोणती आहे?**

1. 273
2. 275
3. 257
4. 253

दिलेल्या उदाहरणात, पर्याय 2 बरोबर आहे. त्यामुळे पर्याय क्रमांक 2 चे वर्तुळ खाली दाखविल्याप्रमाणे गोल गडद करावे.

उत्तरावर खूण करण्याची अचूक पद्धत

① ● ③ ④

11) **ओ.एम.आर. प्रपत्रावर एकदा प्रतिसाद नोंदविल्यानंतर आपल्याला उत्तर खाडाखोड करता/बदलता येणार नाही. तसे केल्यास ते चुकीचे उत्तर म्हणून ग्राह्य धरले जाईल.**

उत्तरावर खूण करण्याची चुकीची पद्धत



12) आपण या पुस्तिकेतच आकडेमोड/कच्चे काम करू शकता.

13) आपल्याला अद्यापही काही शंका असल्यास, लगेच क्षेत्रीय अन्वेषकाकडून त्याचे निरसन करून घ्या.

**प्र. 1-5) खालील परिच्छेद वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

कडुनिंब हा छोटी चमकदार पाने असलेला एक उंच, सदाहरित वृक्ष आहे. याचे खोड सरळ उभे असते. याची साल टणक, खरखरीत व खवलेदार असते. हे वृक्ष वसंत ऋतूत छोट्या पांढऱ्या फुलांनी फुलते. याची पूर्ण पानगळती एकाच वेळी होत नसल्यामुळे हे झाड कधीही उघडे पडत नाही. संपूर्ण भारतभर हे झाड आढळते. कडुनिंबाचे संस्कृत नाव 'अरिष्ट' असे आहे, ज्याचा अर्थ आजारातून मुक्त करणारा असा होतो. 'चमत्कारी वृक्ष' या लोकप्रिय नावाने ते ओळखले जाते आहे. कडुनिंबाचा प्रत्येक भाग हा औषधांमध्ये उपयोगात आणला जातो.

कडुनिंबाच्या तेलाला मार्गोसा तेल असे म्हटले जाते, जे त्याच्या बियांपासून मिळवले जाते व कुष्ठरोग व त्वचारोगांच्या उपचारात वापरले जाते. त्याची पाने कांजण्यांच्या उपचारांसाठी वापरली जातात. कडुनिंबाचा चहा डोकेदुखी आणि तापापासून आराम मिळविण्यासाठी घेतला जातो. त्याच्या फुलाचा वापर आतड्याचे विकार बरे करण्यासाठी होतो. कडुनिंबाची साल व डिंक सुद्धा मौल्यवान औषधी आहेत.

भारतातील लोक कडुनिंबाच्या काड्यांचा वापर दात घासण्यासाठी करतात. कडुनिंबाच्या वाळलेल्या पानाचा वापर कप्पे व कपाटात झुरळे व किड्यांना दूर ठेवण्यासाठी करतात. कडुनिंबाचा वापर भाज्या व ऊसासाठी खत म्हणून केला जातो.

काही लोक कडुनिंबाला पवित्र मानतात आणि त्याच्या पानांचा घराच्या प्रवेशद्वाराला दुष्ट शक्तींना दूर ठेवण्यासाठी करतात. नवजात बालकांना आरोग्यासाठी व रोगांपासून दूर ठेवण्यासाठी कडुनिंबाच्या पानांवर झोपवतात. कडुनिंब हा जगभरातील लोकांसाठी अद्भुत वृक्ष आहे, यात काही संशय नाही.

**प्र. 1) कडुनिंबाची साल ही ________ असते.**

1) मऊ आणि हिरवी
2) खरखरीत आणि खवलेदार
3) मऊ आणि खवलेदार
4) टणक आणि हिरवी

**प्र. 2) कडुनिंबाची फुले ________ च्या उपचारात लाभदायक असतात.**

1) त्वचारोग
2) कांजण्या
3) आतड्याचे विकार
4) ज्वर

**प्र. 3) वाळलेली पाने कपाटात ________ साठी ठेवली जातात.**

1) पालींना व मुंग्यांना दूर ठेवण्यासाठी
2) किड्यांना दूर ठेवण्यासाठी
3) कपड्यांची चमक कायम ठेवण्यासाठी
4) कपाटाला स्वच्छ ठेवण्यासाठी

**प्र. 4) काही लोक त्यांच्या घराच्या प्रवेशद्वाराला कडुनिंबाची पाने बांधतात : ________**

1) दुष्ट शक्तींना दूर ठेवण्यासाठी
2) किडीला दूर ठेवण्यासाठी
3) त्यांची घरे सजविण्यासाठी
4 ) आजारातून बरे करण्यासाठी

**प्र. 5) कडुनिंबाला 'अद्भुत वृक्ष' म्हणतात, कारण :**

1) त्याच्या काड्यांचा वापर दात घासण्यासाठी होतो.
2) हे उपयुक्त खत आहे.
3) हे नवजात शिशूंचे रक्षण करते.
4) झाडाचा प्रत्येक भाग उपयोगी आहे.

**प्र. 6-10) खाली दिलेली गोष्ट वाचा व त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**हेमा :** हॅलो! मी हेमा. तुम्हाला माहीत आहे मला सगळ्यात जास्त आनंद केव्हा होतो? मला माझे कुटुंब आणि मित्रांसोबत ऐतिहासिक स्थळांना भेटी द्यायला आवडते. मागच्या वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मी हैदराबादला भेट दिली आणि चारमिनार व गोवळकोंडा किल्ला पाहिला. यावर्षी मी आग्र्याला भेट दिली आणि ताजमहाल पाहून खूप आनंद झाला. प्रत्येक वेळी मी नवीन स्थळाला भेट देते, मी नवीन मित्र-मैत्रिणी बनवते. तुमच्या मते, पुढच्या वर्षी मी कोणत्या स्थळाला भेट द्यावी?

**अली :** माझे नाव अली आहे. तुम्हाला सगळ्यांना भेटून छान वाटले. मी नवीन गोष्टी शिकण्यास खूप उत्सुक असतो. माझ्या विज्ञानाच्या शिक्षिका अधिकाधिक पुस्तके वाचण्यास मला नेहमीच प्रोत्साहित करतात. त्या सांगतात की, प्रश्न विचारणे ही वैज्ञानिक कुतूहलाची (जिज्ञासेची) सुरुवात असते. मागच्या आठवड्यात मी 'प्रश्नांचा शोध' नावाचे पुस्तक वाचले आणि ते खूप माहितीपूर्ण व मनोरंजक होते. तुम्ही सांगू शकाल का की पाऊस थेंब-थेंबच का पडतो? याचे उत्तर त्या पुस्तकामध्ये सापडले.

**रजत :** हॅलो मित्रांनो! मी रजत. मला वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांची आवड आहे. मला फुटबॉल खेळायला खूप आवडते. त्यालाच सॉकर असेही म्हणतात. प्रत्येकी अकरा-खेळाडू असलेल्या दोन टीममध्ये हा खेळ खेळला जातो. या खेळामध्ये गोलकीपर्स, डिफेंडर्स आणि स्ट्राइकर्स असतात. मी सगळे फुटबॉल सामने पाहतो. एक दिवस मला बायचुंग भुतियासारखे भारतासाठी खेळायचे आहे. मला त्याच्यासारखे स्ट्रायकर व्हायचे आहे.

**जॉन :** हॅलो! मी जॉन. पर्यावरण 'स्वच्छ व हिरवे' ठेवणे हा माझा छंद आहे. तुम्हाला माहीत आहे का, की या पावसाळ्यात मी माझ्या शाळेत चार रोपे लावली? ती जांभूळ, लिंब, आंबा आणि गुलमोहराची आहेत. माझ्या शिक्षकांनी सांगितले की, आपण त्या रोपांच्यापुढे झाडाची नावे लावू. माझ्या वर्गातील सोमा ते पत्रक डिझाईन करत आहे. ड्रॉईंग आणि पेंटिंग हा तिचा छंद आहे.

**प्र. 6) गोवळकोंडा किल्ला आणि ताजमहल या दोन्हींमध्ये काय साधर्म्य आहे?**

1) ते आग्र्यामध्ये स्थित आहेत.
2) त्यांना ऐतिहासिक मूल्य आहे.
3) भेट देण्यासारखी केवळ तिच स्थळे आहेत.
4) ते हैदराबादमध्ये स्थित आहेत.

**प्र. 7) फुटबॉलबाबत कोणती गोष्ट सत्य <u>नाही</u>?**

1) त्याला सॉकर असेही म्हणतात.
2) तो अकरा खेळाडूंकडून खेळ खेळला जातो.
3) तो खेळण्यासाठी दोन टीमची आवश्यकता असते.
4) हा खेळ फक्त गोलकीपर्ससाठी आहे.

**प्र. 8) रोपे कशी ओळखली जातात?**

1) झाडांची नावे रोपांजवळ लावली जातील.

2) शिक्षक रोपांचा मागोवा ठेवतील.

3) शाळेमध्ये फक्त चार झाडे असतील.

4) मुले नावे लक्षात ठेवतील.

**प्र. 9) सोमा कशामध्ये चांगली आहे?**

1) झाडे लावणे.

2) सॉकर खेळणे

3) पुस्तक वाचणे.

4) ड्रॉईंग आणि पेंटिंग

**प्र. 10) हेमा आणि अलीच्या छंदांमध्ये काय साधर्म्य आहे?**

1) त्यांना रोपे व झाडे लावायला आवडते.

2) ते फुटबॉल खेळण्याचा आनंद घेतात.

3) त्यांना नवीन गोष्टी, स्थळे शोधायला आवडतात.

4) त्यांना टेलिव्हिजनवर सामाने पाहायला आवडते.

**प्र. 11-15) खाली दिलेले भित्तीपत्रक वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**




**प्र. 11)** **या जाहिरातीचा मुख्य उद्देश ——— आहे.**

1) पाणी वाचविण्यास प्रोत्साहन देणे.

2) स्वच्छतेला प्रोत्साहन देणे.

3) गांधीजींबद्दल बोलणे.

4) लोकांकडून दंड गोळा करणे.

**प्र. 12)** **''जगात हवा असलेला बदल आधी आपल्यात घडवा!'' या विधानाने आपल्याला काय बोध झाला?**

1) जगात बदल घडवण्यासाठी कठोर मेहनत करा.

2) जगात हवा असलेल्या बदलाचा आपल्यापासून प्रारंभ होत असतो.

3) जगाला बदलण्यापूर्वी ते पाहा.

4) जर आपण स्वत:कडे पाहिले तर जगही बदलते.

**प्र. 13) जर तुम्ही ________ तर तुम्हाला दंड केला जाईल.**

1) कचराकुंडी वापरली
2) पिकदाणी वापरली
3) रेल्वे परिसरात कचरा फेकला
4) नळ बंद केला

**प्र. 14) एका मुलीने तिच्या वडिलांना केळाची साले सीटखाली न फेकण्याविषयी सांगितले. या वाक्याला जाहिरातीतील कोणते विधान लागू होते?**

1) कचरा केवळ कचराकुंडीतच फेकावा.
2) पिकदाणी वापरली पाहिजे.
3) शौचालयाचा वापर करा.
4) पाणी वाचवा.

**प्र. 15) स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश काय आहे?**

1) केवळ रेल्वेचा परिसर स्वच्छ आणि नीटनेटका ठेवणे.
2) गांधीजींच्या विचारांना लोकप्रिय करणे.
3) भारतभर शौचालये बांधणे.
4) भारताला स्वच्छ करणे.

**Q. 16) Which of the amount of time given below will be same as that of one day?**

1) $12 \times 12$ hours

2) $24 \times 60$ minutes

3) $24 \times 12 \times 60$ seconds

4) 1 / 360 year

**Q. 17) Subtract $\frac{5x}{8} - \frac{3x}{8} = ?$**


1) $\frac{1}{4}$

2) 5

3) $3x$

4) $\frac{x}{4}$

**Q. 18) ABCD is a quadrilateral. Another quadrilateral PQRS is congruent (same size and shape to ABCD). ∠ P and ∠ S measure 80° which of the statements could be true:**




1) PQ = AB

2) ∠Q is right angle.

3) All sides of PQRS are of same length.

4) The area of PQRS is less than the area of ABCD.


**Q. 19)** **The test marks in three subjects for Rita and Renu studying in the same class are given below:**

| | Physics | Chemistry | Mathematics |
|---|---|---|---|
| Rita | 78 | 76 | 74 |
| Renu | 72 | 82 | 74 |

**Which of the statements below about their average scores is correct?**

1) Rita's average score is higher than Renu's
2) Rita's average score is lower than Renu's
3) Average score of Rita and Renu are equal
4) Average score of Rita and Renu cannot be compared

**Q. 20)** **The graph shows the distribution of four different types of schools: Boys schools, Girls schools, Co-ed schools and Evening schools.**




**Which sentence below is correct?**

1) Co-ed schools are more than the Boys schools.
2) Boys' schools are more than the one-half of the total schools.
3) Evening schools are more than one- third of the total schools.
4) The total number of Girls' and Co-ed schools is greater than the number of Boys' schools.

**Q. 21) In which of the lists given below, are the numbers ordered from greatest to smallest?**

1) 0.355, 0.4, 0.43, 0.444
2) 0.4, 0.43, 0.444, 0.355
3) 0.43, 0.355, 0.444, 0.4
4) 0.444, 0.43, 0.4, 0.355

**Q. 22)** $\frac{5}{7}+\left(\frac{5}{14}\times\frac{6}{21}\right)=?$

1) $\frac{5}{7}$
2) $\frac{6}{49}$
3) $\frac{5}{49}$
4) $\frac{40}{49}$

**Q. 23) A thin wire 30 cm long is formed into a rectangle. If the width of this rectangle is 6 cm. What is its length?**

1) 6 cm
2) 9 cm
3) 12 cm
4) 18 cm


**Q. 24) When a new bridge is built, the average time taken by a bus to travel from one city to another is reduced from 50 minutes to 40 minutes. What is the percentage decrease in time taken to travel between two cities?**

1) 10%
2) 20%
3) 45%
4) 50%

**Q. 25)** **A square board has an area of 7056 cm2. How long is each side of the board?**

1) 76 cm
2) 84 cm
3) 86 cm
4) 94 cm

**Q. 26)** **In the figures below, small blocks**  **are put together to get bigger blocks. If all the small blocks are of the same size, which one of the bigger blocks will have a different volume than the others?**





**Q. 27)** **The age of Ravi's father is 5 years more than 3 times Ravi's age. If Ravi's age is x years, his father's age can be expressed as:**


1) $3x + 5$
2) $(x - 5)/3$
3) $3\ (x + 5)$
4) $(x\ /\ 3) - 5$

**Q. 28)** **From the bar graph given below, in which of the two months the difference between the consumption of electricity is 30 mega Watts?**

1) February and March
2) February and April
3) February and April
4) March and May




**Q. 29)** **Look at the number line below.**




**Which of the following has the greatest value?**

1) q + p
2) q − p
3) qp
4) q/p

**Q. 30)** **$5^{200}$ is equal to:**

1) $5^{100} + 5^{100}$
2) $2^{100} + 3^{100}$
3) $5^{100} \times 5^{100}$
4) $5^{100} \times 5^{2}$

**Q. 31) A car travels 60 km in 2 hours. What is the speed of the car?**

1) 120 km/h
2) 60 km/h
3) 30 km/h
4) 20 km/h

**Q. 32) Four students boiled same quantity of water in similar test tubes. They placed their test tubes in different zones of the flame as mentioned below:**

**Student A - Outermost zone**

**Student B - Middle zone**

**Student C - Innermost zone**

**Student D - Between middle and innermost zone**

**Whose water will boil first?**

1) Student A
2) Student B
3) Student C
4) Student D


**Q. 33) A farmer wants to do farming of roses. Which of the methods of propagation should be followed?**

1) Spore formation
2) Fragmentation
3) Gamete formation
4) Cutting

**Q. 34) There is a tree in your school campus. During autumn its leaves shed. What is the best way to dispose of these leaves?**

1) Burn the leaves outside the school campus.
2) Throw the leaves in a nearby water body.
3) Put the leaves in a pit to get compost.
4) Let the leaves scatter in the school campus.

**Q. 35)** **A ray of light strikes a mirror as shown in the diagram by the incident ray.**




**The reflected ray would be:**


1) Ray A
2) Ray B
3) Ray C
4) Ray D

**Q. 36)** **Which of the forces given below is a contact force?**

1) Magnetic force
2) Electrostatic force
3) Gravitational force
4) Force of friction

**Q. 37)** **A ball is released from point A to travel on different horizontal surfaces. On which of the following surfaces the ball will travel maximum distance?**

1) Brick
2) Glass
3) Cement
4) Mud



**Q. 38) A ray of light strikes a mirror as shown in the diagram by the incident ray.**

| Temperature | City A | City B | City C | City D |
|---|---|---|---|---|
| Lowest | $18^0$ C | $-5^0$ C | $16^0$ C | $-6^0$ C |
| Highest | $42^0$ C | $7^0$ C | $30^0$ C | $6^0$ C |
| Precipitation | 0 cm | 5 cm | 2.5 cm | 0 cm |

**In which city did it snow?**

1) City A
2) City B
3) City C
4) City D

**Q. 39) Which of the statements is an example of a neutralization reaction?**

1) Addition of litmus solution to hydrochloric acid
2) Addition of litmus solution to caustic soda
3) Applying of quick lime (calcium oxide) to basic soil
4) Applying baking soda (sodium bicarbonate) on ant bite

**Q. 40) Many industries have come up around the area of Taj Mahal in Agra. Which of the reasons given below, arising from the industrial presence is damaging the Taj?**

1) Occurrence of acid rain.
2) Effect of noise levels
3) Crowding in the cities
4) Weaving of carpets

**Q. 41) Reshma accidentally placed her hand over a flame and immediately pulled it back. She felt sensation of heat. The message of sensation is carried through :**

1) blood cells.
2) skin cells.
3) nerve cells.
4) muscle cell.

**Q. 42) Which one of the following uses the magnetic effect of electric current?**

1) Electroplating
2) Electric iron
3) Electric bulb
4) Electric bell

**Q. 43) Which one of the changes given below cannot be reversed?**


1) Formation of steam from water
2) Burning of coal
3) Dissolving salt in water
4) 4. Melting of wax

**Q. 44) When does respiration occur in plants?**

1) Only during night time
2) Only during day time
3) All the time
4) 4. Only when photosynthesis does not occur.

**Q. 45) The figure given below shows a food web. In the food web we have the primary consumers and the secondary consumers.**


**The arrows point from the organism that gets eaten to the one that eats it.**




**Which sentence is true?**

1) Primary consumers eat plants.
2) Primary consumers eat animals.
3) Owls are primary consumers.
4) Carrots are primary consumers.

प्र. 46) दिलेल्या भारताच्या नकाशाचे निरीक्षण करा.




छायांकित भागामध्ये कोणते पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते?

1) मका

2) गहू

3) भात

4) बाजरी


**प्र. 47) तुम्ही वर्गात असताना भूकंप झाला, अशा वेळी स्वतःला वाचविण्यासाठी तुम्ही कोणती कृती त्वरित कराल?**

1) इतरांना मदतीला बोलावणे.
2) शिक्षकांच्या सूचनांची वाट पाहणे.
3) जिथे असाल तिथेच खाली बसणे.
4) डोक्याचे संरक्षण करण्यासाठी डोक्यावर आच्छादन घेणे.

**प्र. 48) इंग्रज राजवटीत भारतातील हस्तव्यवसाय उद्योगात घसरण होण्यास खालील पर्यायांपैकी कोणते कारण होते?**

1) ब्रिटनमधून आयात केलेल्या करमुक्त व स्वस्त मशिन्सद्‌वारे भारतात माल बनविला जात असे.
2) युरोपमध्ये भारतीय माल आयात करण्यासाठी जास्त कर लावला जात असे.
3) भारतातील कच्चा माल ब्रिटनमध्ये निर्यात करण्याचे ब्रिटीशांचे धोरण होते.
4) भारतीय लोकांवर पाश्चात्य जीवनशैलीचा प्रभाव पडला होता.

**प्र. 49) खाली दिलेल्या आकृतीमध्ये $10^0$ उत्तर व $10^0$ दक्षिण या अक्षांशादरम्यान कोणता हवामान विभाग दर्शविला आहे?**




1) ध्रुवीय
2) विषुववृत्तीय
3) समशीतोष्ण
4) मोसमी

**प्र. 50) इंग्रजी राजवटीमध्ये भारतात खालील कोणता पर्याय सामाजिक सुधारणेशी संबंधित आहे ?**


1) मतदानाचे वय 21 वरून 18 असे कमी करणे.

2) टपाल व्यवस्थेची सुरुवात.

3) रेल्वेची स्थापना

4) सतीप्रथेचे उच्चाटन

**प्र. 51) खाली दिलेल्या मातीच्या थरांच्या आकृतीचे निरीक्षण करा.**




**पिकांच्या लागवडीसाठी मातीचा सर्वोत्तम थर कोणता ?**


1) B

2) C

3) A

4) D

प्र. 52) खाली दिलेल्या नदीच्या आकृतीचे निरीक्षण करा.




आकृतीतील प्रश्नचिन्हाने (?) दर्शवलेला भाग ओळखा.

1) नालाकृती सरोवर
2) त्रिभुज प्रदेश
3) धबधबा
4) वळण

**प्र. 53) खालीलपैकी कोणते कारण भारतीय सैनिकांना 1857 चा उठाव करण्यासाठी कारणीभूत ठरले?**

1) गाई व डुकराची चरबी असल्याचा संशय असलेल्या काडतुसांच्या वापरास सुरुवात.

2) ब्रिटिश सैनिक व वरिष्ठांच्या तुलनेत भारतीय सैनिकांना मिळणारी अयोग्य वागणूक.

3) ब्रिटिश वरिष्ठांकडून भारतीय सैनिकांना त्यांच्या धार्मिक बाबींवरून रोजच मिळणारी अपमानास्पद वागणूक.

4) भारतीय सैनिकांना आपण ब्रिटिश सैनिकांपेक्षा संख्येने कितीतरी अधिक आहोत अशी झालेली जाणीव.

**प्र. 54) रस्त्याच्या कडेला असलेल्या चहाच्या टपरीवर एक 10 वर्षांचा मुलगा काम करत आहे. भारतीय संविधनाने दिलेल्या कोणत्या मूलभूत हक्काचे उल्लंघन या परिस्थतीमध्ये झाले आहेत?**

1) समानतेचा हक्क

2) शिक्षणाचा हक्क

3) स्वातंत्र्याचा हक्क.

4) शोषणाविरुद्धचा हक्क.

**प्र. 55) खालील पर्यायांपैकी कोणती संस्था कायदेनिर्मिती करण्याचे काम करते?**

1) फक्त लोकसभा

2) फक्त राज्यसभा

3) संसद

4) सर्वोच्च न्यायालय

**प्र. 56) भारतामध्ये स्थानिक शासनाकडून स्वच्छता का पुरवली जाते?**

1) भारतीय संविधानामध्ये असलेल्या जगण्याचा हक्काचा तो भाग आहे.

2) स्थानिक शासनाला दुसरे कोणतेही काम नाही.

3) भारतीय कायदा खाजगी क्षेत्राला हे काम करण्यास परवानगी देत नाही.

4) लोकांना ही कृती स्वतःला करता येत नाही.

**प्र. 57) खालीलपैकी कोणती सार्वजनिक सुविधा फक्त शासनाकडून पुरवली जाते?**

1) रेल्वे

2) शिक्षण

3) बस सुविधा

4) अन्न धान्य पुरवठा

**प्र. 58) समजा तुमच्या जिल्ह्यातील लोकांना एक नवीन शाळा त्यांच्या भागात हवी आहे. परवानगी देण्यासाठी सक्षम प्राधिकारी कोण आहे?**


1) उच्च न्यायालय

2) फक्त केंद्र शासन

3) फक्त राज्य शासन

4) राज्य व केंद्र शासन दोन्हीही

प्र. 59) खाली दिलेला नकाशा अकबर व औरंगजेबाच्या शासन काळातील अशी स्थळे दर्शवितो, ज्यांनी मुघल सत्तेचा काही भाग व्यापला होता. नकाशाचे निरीक्षण करा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या.




चितोड व अंबर सद्ध्याच्या कोणत्या भारतीय राज्यांमध्ये स्थित आहे?

1) गुजरात.

2) मध्यप्रदेश.

3) उत्तर प्रदेश.

4) राजस्थान.

**प्र. 60) समजा तुमच्या वर्गासाठी तुम्हाला 2000 पेन खरेदी करण्याची इच्छा आहे. खालीलपैकी कोणत्या दुकानामध्ये जाण्यास तुम्ही प्राधान्य दयाल?**

1) घाऊक स्टेशनरी दुकान

2) आठवडे बाजारातील दुकान

3) किरकोळ स्टेशनरी दुकान

4) रस्त्यावरील दुकान

❑❑❑